Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - I JANUARY 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

२०१२ च्या क्रीडा धोरणाअंतर्गत क्रीडा विषयक पायभुत क्रीडा सुविधांची निर्मिती: चिकित्सक अभ्यास

प्रा. आर. एस. देवकाते
शारीरिक शिक्षण संचालक,
महात्मा फुले नुतन महाविद्यालय मिरजगाव

डॉ.शरद आहेर,
सहयोगी प्राध्यापक,
चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय

घोषवारा:

महाराष्ट्र राज्यामध्ये क्रीडा संस्कृतीचे जतन करून या परंपरेचा वारसा चालविण्याकरिता तसेच बदल्या काळानुसार आंतरारष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा लक्षात घेऊन या स्पर्धेस सामोरे जाण्याकरिता क्रीडाक्षेत्राच्या सक्षमीकरणाची आवश्यकता आहे. सदर बाब दृष्टीपुढे ठेवून राज्य शासने नवीन क्रीडा धोरण तयार करण्याचा निर्णय घेतला होता.यामध्ये राज्यात खेळांच्या पायभुत सुविधांचा विकास, राज्यातील क्रीडा सुविधांचा विकास, कुस्ती केंद्राचा विकास, खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्पर्धेची स्पर्धेची पुर्व तयारी करण्याकरिता खेळांची वर्गवारी करून अर्थसाय्य, राज्यातील क्रीडा प्रबोधनीतील सक्षमीकरणी, आंतरराष्ट्रीय सपर्धेतील पदक विजेत्या खेळाडू व मार्गदर्शकांना रोख पारितोषिक व थेट नोकरीची संधी, राज्य क्रीडा विकास निधीत वाढ, महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदे अंतर्गत विवध क्रीडा संघटना व क्रीडा संस्था यांना अर्थसहाय्य, साहसी खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात महाराष्ट्र स्टत ॲडव्हेचंर स्पोर्टस सेंटरची स्थापना करण्याचा निर्णय घेतला होता.सदर राज्य शासनाच्या २०१२ च्या क्रीडा धोरणाला अनुसरून शासन निर्णयांची अंमलबजावणी प्रभावीपणे झाली तर, त्याच्या क्रीडा क्षेत्रामध्ये सकारात्मक परिणाम दिसून येतील.

महत्वाच्या संज्ञा: क्रीडा धोरण, पायाभुत सुविधा, आर्थिक सहाय्य, क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा संस्था, उदयन्मुख खेळाडू, साहसी खेळ

प्रस्तावना

बदलत्या काळानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा लक्षात घेऊन या स्पर्धेस सामोरे जाण्याकरिता क्रीडा क्षेत्राच्या सक्षमीकरण्याची आवश्यकता आहे. सदर बाब दृष्टीपुढे ठेऊन राज्य शासनाने नविन क्रीडा धोरण तयार करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयास अनुसरून नियुक्त करण्यात आलेल्या समितीने केलेल्या शिफारसीनुसार राज्याचे क्रीडा धोरण तयार करण्यात आले आहे. क्रीडा विषयक पायाभुत सुविधांची निमिर्ती, अत्याधुनिक प्रशिक्षण, खेळाडूंना आर्तिक सहाय्य, प्रोत्साहन, क्रीडा महोत्सवाचे आयोजन, क्रीडा विद्यापीठाची स्थापना, साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन तसेच क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थाना प्रोत्साहन उत्यादी बाबींचा समावेश या धोरणामध्ये करण्यात आला आहे.या धोरणाच्या अंतर्गतच पायाभुत राज्यामध्ये क्रीडा सुविधांची निमर्ततीकरण्याचा निर्णय जाहिर केला असून त्याला अनुसरून संशोधकाने त्याचा अभ्यास करावयाचा ठरविला असून तो पुठील मुद्याच्या आधारे स्पष्ट केला आहे.

क्रीडा विषयक पायभुत सुविधांची निर्मिती :

१.१. क्रीडांगणाचे आरक्षण:

सर्वासाठी सदृढता, हा क्रीडा धोरणाचा गाभा असून समाजातील प्रत्येक नागरीक, अबाल वृध्द हे सृदृढ असणे आवश्यक आहे. यासाठी महानगर पालीका, नगरपरिषद, जिल्हापरिषद, ग्रामपंचायत, पंचायत समिती, औद्यागिक वसाहती आदी क्षेत्रामध्ये क्रीडागण व मानोरंजनासाठी राखीव भुखंडाची आरक्षणे भविष्यामध्ये बदलण्यात येऊ नयेत. संबधीत स्थानिक स्वराज्य संस्था / प्राधिकरण/ शासन यांनी त्यांचा अखत्यारितील अशी मैदाने तत्काळ अद्यावतपणे विकसित करून आजुबाजुच्या परिसरातील शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये/ क्रीडा संस्था, वसाहती, खेळाडू, नागरिक यांना उपलब्ध करून द्यावीत. ज्या सहकारी, खाजगी उद्योगसमुहसंस्थाना शासनामार्फत जमीन करून दिली आहे, त्या सहकारी संस्थातील मोकळी जागा इतर खेळांडुना खेळण्यासाठी उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच क्लबच्या उपलब्ध क्रीडा सुविधांचा उपयोग करून घेण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांकडून नाममात्र फी आकारून दुपारी १२ ते ४ या वेळात उपलब्ध करून देण्यात याव्यात. उपलब्ध क्रीडा सुविधांचा वापर करण्याबाबत सांमजस्य करार करताना अटी व शर्ती जाचक असू नयेत. तसेच शाळांना क्रीडागणांची नोंदणी जिल्हा क्रीडा आधिकारी कार्यलयाकडे सक्तीची करण्यात येईल असे शासन निर्णयानुसार जाहीर करण्यात आले होते.

१.२ क्रीडा साहित्य अनुदान: खेळांडूना दैनंदिन सराव, क्रीडा स्पर्धा, प्रशिक्षण तसेच विद्यार्थ्यांना खेळाची आवड

निर्माण करण्यासाठी खेळाचे साहित्य अत्यावश्यक आहे. शासनामार्फत क्रीडांगण विकास योजना, गाव तेथे क्रींडागण व्यायामशाळा, विकास या योजना राबविण्यात येणार होत्या. या योजनेतुन शैक्षणिक व क्रीडा संस्थाना खेळाच्या सुविधा, व्यायाम शाळेचे बांधकाम व व्यायामाची अद्यावत साहित्य इ. साठी अनुदान देण्यात येते. शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रम, चाचण्या इ. साठी पुरेसे साहित्य संस्थामध्ये असणे अत्यावश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, क्रीडा संस्था यांचे करिता क्रीडा साहित्य अनुदानाची योजना अंमलात आणण्यात आली.ा.

विभागीय, जिल्हा तसेच तालुका स्तरावर जेथे शासनाची क्रीडा संकुले तयार झालेली आहेत तेथे उत्कृष्ठ दर्जाचे क्रीडा साहित्य सवलीतीच्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी संकुलाच्या जागेचा वापर करण्यात येईल. अंमलबजावणी करण्याचे योजले.

१.३. राज्यातील क्रीडा सुविधांचे सर्वेक्षण करणे:

महाराष्ट्र राज्याला क्रीडा संस्कृतीचा मोठा वारसा असून क्रीडा धोरण राबिणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असून क्रीडा विषयक पायाभुत सुविधा निर्माण व विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर आहे. राज्यातील व्यायामशाळ, क्रीडागणे, जलतरण तलाव, विविध खेळांची मैदाने इ. सुविधांची माहिती संकलित करणे आवश्यक आहे. क्रीडा विभागामार्फत सर्वेक्षणाची विशेष मोहिम हाती घेण्यात आली. विशेष अनुदान देऊन क्रीडा सुविधा सर्वेक्षणाची माहिती संगणीकृत करण्यात येणार होती.

१.४ तालीम, कुस्ती केंद्राचा विकास करणे :

ग्रामिण व शहरी भागात कुस्ती खेळाची विशेष आवड आहे. हा खेळ प्रामुख्याने माती व गादी विभागात खेळला जातो. मातीच्या आखाडा/ तालीम यांची विशेष ओळख सर्वत्र आहे. कुस्तीच्या तंत्रात झालेले बदल लक्षात घेऊन आखाडा / तालीमीचे आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. यासाठी खालील उपाय योजना करण्यात येतील.

- मातीचे आखांड्याचे बांधकाम, तालमींच्या दुरुस्ती व मॅटस घेण्याकरिता क्रीडा मंडळे, कुस्ती कलेच्या विकासाचे कार्य करणाऱ्या नोंदणीकृत संस्थाना रू.७.०० लक्ष अर्थसहाय्य देण्यात येईल.
- तालीम/आखाड्याच्या ठिकाणी आधुनिक प्रशिक्षणासाठी उपकरणे, मसाजसेंटर, सोना, स्टीम बाथ, स्मार्ट फुल, जॅकुझी इत्यादी सुविधा विकसित करण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येईल.

१.५ विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकुल बांधकाम सुविधांचा वापर देखभाल दुरुस्ती व वाणिज्य प्रायोजन

राज्यात आंतरराष्ट्रीय व राष्टीय दर्जाच्या पायाभुत सुविधा निर्मितीसाठी विभाग, जिल्हा क्रीडा संकुलाची उभारणी करण्यात येत आहे. सद्य स्थितीत विभागीय क्रीडा संकुल रू. २४ कोटी, जिल्हा क्रीडा संकुल रू.८ कोटी तालुका क्रीडा संकुल रू १ कोटी बांधकाम अनुदान देण्यात येते. संकुलाचे बांधकाम विशिष्ट कालमर्यादेत पुर्ण करणे अत्यावश्यक आहे. बांधकामाचे वाढते दर व निश्चित करण्यात आलेली अनुदाने मर्यादा या बाबी पहाता संकुलांना पुर्णत: अनुदान एकाच वेळी देणे आवश्यक आहे. हाती घेतलेला प्रकल्प प्रथमता: पुर्णत्वास नेण्यासाठी बांधकामाचे उर्वरित अनुदान दराचे पुर्नमुल्यांकन शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून दोन वर्षानी करण्यात येईल.

सुविधांचा वापर :

संकुलामध्ये क्रीडा सुविधा खेळांडुसाठी दैंनदिन सराव, प्रशिक्षण स्पर्धा यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. या सुविधा खेळाडूंना माफक दरात मिळविण्यासाठी दर निश्चित करावेत. क्रीडा उपक्रमाव्यतीरिक्त अन्य बाबीसाठी भाड्याचे वेगळे दर निश्चित करण्यात येतील.

देखभाल दुरुस्ती :

शासकीय अनुदानातून क्रीडा संकुल निर्मितीसाठी शासन अनुदान देते. संकुल समित्यांना देखभाल दुरूस्ती व इतर आर्वत्ती खर्च भागविण्यासाठी विभागीय संकुल रुपये १५.०० लाख, जिल्हा क्रीडा संकुल रू. १०.०० लाख रूपये व तालुका क्रीडा संकुल रू ३.०० लाख रुपये (वेतन भत्यासह) देण्याची तरतुद करण्यात आली आहे.

वाणिज्यिक प्रयोजनातुन सुविधांचा विकास :

वाणिज्यिक प्रयोजनातुन संकुलांची निमिर्ती करण्यासाठी मार्गदर्शत्तत्वे शासनाने निर्गमित केली आहेत. शहराच्या मध्येवर्ती ठिकाणी बांधा, वापरा व हस्तांतरीत करा व पब्लीक प्रायवेट पार्टनरशिप इ. माध्यमातुन संकुलासाठी खाजगी गुंतवणुकदार मिळवुन आधुनिक संकुले उभी करण्यात येतील. संकुलामध्ये क्रीडा सुविधा विकसित करण्यात येत आहेत. त्या शिवाय क्रीडा संकुल क्षेत्रात उपहारगृह, क्लब हाऊस इ. सुविधा विकसित करण्यात येतील. खेळांडूना माफक दरात संकुलातील सुविधा उपलब्ध होण्यासाठी उपक्रमा

व्यतीरिक्त बाबीसाठी संकुले भाड्याने देतान वाढीव दर आखारण्यात येईल.

बृहन्मुंबई क्रीडा प्राधिकरणाची स्थापना करणे :

बृहन्मुंबई शहरातील क्रीडा सुविधा निमिर्तीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येतील.

- मुंबई मध्ये बृहन्मुंबई क्रीडा प्राधिकरणाची स्थापना करून त्याअंतर्गत वार्ड निहाय कीडा संकुले तसेच मुंबई शहर, उपनगर व नवी मुंबई या जिल्हयासाठी क्रीडा संकुले त्याची उभारणी करण्यात येतील.
- मुंबई येथे विकसित करण्यात येणाऱ्या क्रीडा सुविधामंध्ये विविध खेळाच्या क्रीडा अकादमी कार्यन्वित करण्यात येतील. खाजगी प्रयोजकांचे सहकार्य घऊन दर्जेदार कामगिरी करण्याऱ्या खेळाडूंना नित्य प्रशिक्षण देण्यात येईल.
- कांदविली येतील शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या जागेरवर आंतरराष्ट्रीय स्पर्धा संयोजनाच्या दृष्टीने विभागीय क्रीडा संकुलाची निमिर्ती करण्यात येईल. या सुविधा विकसित करताना बांधा, वापरा व हस्तांतरीत करा माध्यमातुन सुविधा निर्मिती करण्यात येईल.
- बृहन्मुंबई क्रीडा प्राधिकरणाची स्थापना करून त्याच्या कार्यकक्षेमध्ये मुंबई येथील मैदांचा सुयोग वापर, क्रीडा अकादमीचे कार्यान्वय, संकुलाची बांधकामे, क्रीडागणी वरील अतिक्र मण हाटवणे, क्रीडा विकासासाठी सहाय्यभुत असणाऱ्या बाबी अंतर्भुत करण्यात येतील.
- मुंबई येतील क्रीडागणाचा वापर सुयोग वापर करण्यासाठी उदा. ब्रेबॉन स्टेडीयम, पुंरदरे स्टेडियम, जिमखाने वापरण्यासाठी क्रीडा प्राधिकरणाचे संनियंत्रण राहिल.

राज्य क्रीडा विकास समितीची पुर्नरचना :

महाराष्ट्र स्पोर्टस इफ्रा स्टक्चर डेव्हलपमेंठ प्लॅन अंतर्गत योजनाबद्द क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी व त्याचा आढावा घेण्यासाठी राज्य क्रीडा विकास समितीची स्थापना करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. या समितीची व्यापकता पाहता त्यांची पुनर्रचना करण्यात येईल. यामध्ये मा. मंत्री,(क्रीडा)- अध्यक्ष, मा. राज्यमंत्री,- उपाध्यक्ष, मा.प्रधान सचिव- नियोजन, वित्त व क्रीडा – सदस्य. तसेच संचालक क्रीडा हे सदस्य सचिव असतील. या समितीला राज्य क्रीडा विकास समितीप्रमाणेच कार्यकक्षा व अधिकार राहतील.

१.६ आमदार स्थानिक विकास निधीतुन क्रीडा विषयक उपक्रम व बाबीमध्ये सध्याचे तरतुदी खेरीज खालीलप्माणेच सुधारणा करण्यात येतील.

- व्यायामशाळा बांधकाम व साहित्य तसेच क्रीडागण विकास इ. बाबींसाठी मर्यादा रू. ७.०० लक्ष करण्यात येईल.
- खेळांडूना वैयक्तीक क्रीडा साहित्य खरेदी करण्यासठी रू. १.०० काळपर्यंत अर्थसाहाय्य देण्यात यावे. आंतरराष्ट्रीय कामिगरी केलेल्या खेळाडंना याचा लाभ देण्यात येईल.
- खेळाडूंना इजा, दुखातत, वैध्यकीय उपचारासाठी रू २.०० लाख कमाल मर्यादेत अर्थसहाय्य करण्यात येईल.
- आमदार स्थानिक विकास निधीतून क्रीडा स्पर्धांसाठी खालील मर्यादेत अर्थसाहाय्य देण्यात येईल.

१.७ राज्य क्रीडा विकास निधी व जिल्हा विकास निधीची स्थापना :

अ. राज्य क्रीडा विकास निधी व जिल्हा निधीची स्थापना

राज्य व ज्लि स्तरावर क्रीडा विकासाचे उपक्रम परिणामकारकरित्या राबविणे, राज्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाची कामगिरी करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी राज्य क्रीडा विकास निधी उभारण्याबाब्त दि. ३ सप्टेबर २००३ शासन निणर्यान्वये निर्णय घेतलेला आहे.

अ.क्र	स्पर्धा	अनुदान (रू लाखात)
१	स्थानिक क्रीडा स्पर्धा तसेच क्रीडा मंडळ, क्रीडा संस्था यांनी अधिकृत संघटनेच्या मान्यतेने आयोजित केल्या जाणाऱ्या निमंत्रीत जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धा	१.००
२	जिल्हा क्रीडा स्पर्धा (अधिकृत संघटनेव्दारा आयोजित आजिंक्य पद तसेच शासकीय स्पर्धा)	२.००
३	राज्य क्रीडा स्पर्धा (अधिकृत संघटनेव्दारा आयोजित आजिंक्य पद तसेच शासकीय स्पर्धा)	४.००
४	राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (अधिकृत संघटनेव्दारा आयोजित आजिंक्य पद तसेच शासकीय स्पर्धा)	५.००
५	आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (अधिकृत संघटनेव्दारा आयोजित आजिंक्य पद तसेच शासकीय स्पर्धा)	१०.००

राज्य क्रीडा विकास निधीचे उत्पनाचे स्त्रोत राज्य शासनाकडून प्रतिवर्षी ५० लक्ष अश्वशर्यतीचे एका दिवसाचे उत्पन (मुंबई शर्यत) विविध औद्योगीक प्रतिष्ठाने वा वाणिज्य प्रतिष्ठानातर्फे देण्यात येणाऱ्या देणग्या, जिल्हयामधून जिल्हा परिषद, महानगर पालिका व नगरपालिकेमार्फत जिल्हा विकास निधीमध्ये जमा होणाऱ्या रकमेपैकी ४० टक्के रक्कम जिल्हा विकास निधीमध्ये शैक्षणिक संस्थाकडून जमा होणाऱ्या निधीपैकी ४० टक्के रक्कम प्रदर्शनीय सामने सांस्कृतिक कार्यक्रम इ. उपक्रमामधुन जमा होणारा निधी अशी आहेत. खालील उपाययोजनेव्दारे राज्य क्रीडा विकास निधी सक्षम करण्यात येईल.

- राज्य शासनाकडून प्रतिवर्षी रूपये ३.०० कोटी अनुदान
- विशेष क्रीडा लॉटरीचे प्रकाशन करून जमा होणारे उत्पन
- औद्यगिक व वाणिज्य प्रतिष्ठानाकडून देणग्या स्विकारण्यात येतील व अशा देणगीदारांना आयकरामध्ये विशेष सवलत देण्यात येतील.
- मुंबई येथील शासनाच्या नियंत्रणाखालील क्रीडागणांच्या भाड्यापोटी जमा होणारी रक्कम
- खाजगी शिक्षण संस्था, नोंदणीकृत संस्था यांना शासनाच्या मालकीच्या जमिनी भाडेपट्टा किंवा मालकीने दिली असल्यास सदर संस्थेव्दारे उत्पनाचे स्त्रोत मिळविण्यासाठी क्रीडांगणावर आयोजित उपक्रमाच्या (उदा. व्यापारी प्रदर्शन, लग्न समारंभ, गरबा इ.) भाड्यापोटी मिळणाऱ्या उत्पनाच्या १० टक्के रक्कम

ब. जिल्हा क्रीडा विकास निधीची स्थापना :

खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्याकरीता विविध उपक्रम , प्रशिक्षण शिबिरे तसेच वेळोवेळी उद्‌भवणाऱ्या अडीअडचणी करिता तात्काळ आर्थिक साहाय्य करणे आवश्यक आहे. राज्यक्रीडा विकास निधीच्या धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यासाठी क्रीडा विकास निधी स्थापन करण्यात येईल. या निधीसाठी शासनाकडून रुपये ५.०० लक्ष इतक्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. औद्योगिक व वाणिज्य प्रतिष्ठानाकडून देणग्या स्विकारण्यात येतील व अशा देणगीदारांना करारामध्ये विशेष सवलत देण्यात येईल.

१.८ क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक साहाय्य करणे :

खेळाडू तयार होण्यासाठी अद्यावत क्रीडा सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. केंद्रशासनामार्फत या सुविधा निर्माण करण्यासाठी अनुदान देण्याची योजना सन २००५-०६ या वर्षापासून बंद करण्यात आलेली आहे. नियोजन आयोगाने क्रीडा सुविधा निर्मितीमध्ये राज्य शासनाने पुढाकार घ्यावा असे केंद्र शासनाच्या क्रीडा मंत्रालयास सुचित केलेले आहे. सद्य स्थितीत केंद्रशासनाकडून नवीन प्रकल्पांना अनुदान देण्यात येत. शैक्षणिक संस्था, कटक मंडळे सेवा भावी संस्था, क्रीडा संस्था नगरपरिषदा महानगरपालिका ग्रामपंचायती यांना प्रकल्प खार्चाच्या ५० टक्के अर्थ साहय्य केंद्र शासनाच्या पुर्वीच्या योजनेत देण्यात येत होते. याच धर्तीवर राज्य शासनामार्फत क्रीडा सुविधा निर्मिती याोजना आखण्यात येईल यामध्ये राज्यशासन व संस्था यांचा ७५:२५ याप्रमाणात हिस्सा राहिल. त्यामुळे क्रीडा संस्कृती जोपासण्यास मदर होईल. खालील बाबीसाठी नविन योजनेत अनुदान येईल.

क्रीडा साहित्य अनुदान :

खेळाडुंना नित्य नियमांने सराव, क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थाना स्पर्धा, प्रशिक्षण इत्यादी करिता क्रीडा साहित्याची आवश्यकता आहे. खेळ व अनुषांगिक साहित्य, प्रशिक्षण उपकरणे इत्यादीसाठी संस्थाना सहाय्य केल्यास खेळांडुच्या कामगिरीचा दर्जे उंचविण्यास सहाय्य होईल. संस्थाकडे स्थावर उत्पनाची साधने उपलब्ध नाहीत ही बाब विचारात घेता, खालील क्रीडा प्रकारांचे क्रीडा साहित्य राज्य शासन व संस्था यांना ७५:२५ या हिश्यात देण्यात येईल.

(खर्च रू. लाखात)

अ क्र.	प्रकल्पाचा प्रकार	अपेक्षित अंदाजित	अनुदान मर्यादा	संस्थेचा हिस्सा
१	**क्रीडागण विकसित करणे** फुटबॉल/हॉकीइ. खेळाची प्रमाणित मैदाने	१०.००	७.५०	२.५०
	प्रमाणित आकाराचे ८ लेन्सच्या धावण पथासह	२०.००	१५.००	५.००
	प्रमाणित आकाराचे क्रॉकिट बास्केटबॉल कोर्ट	१०.००	७.५०	२.५०
	प्रमाणित आकाराचे (मुरूम) टेनिस कोर्ट	१०.००	७.५०	२.५०
	प्रमाणित आकाराचे व्हॉलीबॉल मैदाने	५.००	३.७५.	१.७५

२	**बंदिस्त प्रेक्षागृह**			
	४०*२५*१२.५मी. चेंजीग रुम व स्वच्छतागृहेसह	१२०.००	९०.००	३०.००
	३५*१९*१२.५ मी. आकारापेक्षा कमी नसलेले	९०.००	६७.५०	२२.५०
	१७*१७*७ मी. आकारापेक्षा कमी नसलेले	४०.००	३०.००	१०.००
३	**क्रीडा सुविधा** १८०*१०० मी मैदान आणि ८ लेन्सच्या धावणपथ चेंजीगरूम, प्रसाधनगृह इ.	३६.००	२७.००	०९.००
	१८०*१०० मी आकारापेक्षा कमी नसलेले मैदान ग्रास / सिंडर ६ लेन्सच्या धावणपथ चेंजीगरूम,.	३०.००	२२.५०	७.५०
	जलक्रीडा सुविधा, सहासी खेळांची सुविधा व जलतरण तलाव व्यतिरिक्त	५०.००	३७.५०	१२.५०
	स्के टींग रिंग फ्लोअरिंग आकार ४०*२० मी	१०.००	७.५०	२.५०
	वेलोड्रम प्रमाणित आकाराचा)	५०.००	३७.५०	१२.५०
	शुटींग रेंज	५०.००	३७.५०	१२.५०
	ॲस्ट्रॉटर्फ हॉकी क्रीडांगण)	७५.००	५६.२५	१८.७५
	लॉन टेनिस	२०.००	१५.००	५.००

समारोप :

राज्यातील क्रीड संकृतीचा दर्जात्मक विकास होण्यासाठी राज्य शासनाने २०१२ च्या क्रीडा धोरणास मान्यता दिली व त्याची अंमलबजावणी करण्याचे योजले. क्रीडा विकासाला पोषक अशा स्वरुपाच्या या धोरणात पायाभुत सुविधांच्या विकासाबरोबरच खेळांडूना प्रशिक्षण आणि प्रोत्साहन देण्यात आले.खेळाडुंना नित्य नियमांने सराव, क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थाना स्पर्धा, प्रशिक्षण इत्यादी करिता क्रीडा साहित्याची आवश्यकता आहे. खेळ व अनुषांगिक साहित्य, प्रशिक्षण उपकरणे इत्यादीसाठी संस्थाना सहाय्य केल्यास खेळांडुच्या कामगिरीचा दर्ज उंचविण्यास सहाय्य होईल. सदर धोरणाची प्रभावी अंमलबजावणी झाली तर निश्चितच सकारात्मक परिणाम आपणाला दिसून येतील

संदर्भ सूची :

१. वाखारकर वि.गो., आलेगावकर प.म.(१९८४), 'शारीरिक शिक्षणाचे ऐतिहासिक स्वरूपा',पार्वती प्रकाशन,संस्था, पुणे.
२. क्रीडा व युवक कल्याण विभाग(१९९६)'महाराष्ट्र राज्याचे पहिले क्रीडा धोरण', मुबई.
३. क्रीडा व युवक कल्याण विभाग(२००१)'महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण-२००१', मुबई.
४. क्रीडा व युवक कल्याण विभाग(२०१२)'महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण-२०१२', मुबई